रत्नागिरी
टाइम्स
मंगळवार दि. ११ एप्रिल २००६



नामफलकाचे अनावरण करताना समाजसेवक प्रकाश आमटे, सोबत डॉ. भरत वतवानी, डॉ. स्मीता वतनवानी आ
(छाया: विजय मांडे, कर्जत)

# श्रध्दा पुनर्वसन केंद्राचे प्रकाश आमटे यांच्या हस्ते उद्घाटन

कर्जत, १० एप्रिल (वार्ताहर) - कर्जत तालुक्यातील वेणगावनजिक दिशाशून्य अवस्थेत फिरणाऱ्या मानसीक आजारग्रस्त मनोविकार त्रस्त व निराधारांचे पुनर्वसन करण्यासाठी उभारण्यात आलेल्या 'श्रध्दा पुनर्वसन' केंद्राचे उद्घाटन प्रकाश आमटे यांच्या हस्ते समारंभपुर्वक करण्यात आले.

डॉ. भरत वतवानी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. एकता समुहाचे संचालक अशोक मोहनानी यांनी प्रास्तावीकात पुनर्वसन केंद्राची माहिती देताना सुरुवातीला या केंद्रामध्ये २७ पुरुष मनोविकार त्रस्त रुग्ण आहेत, असे सांगितले. भरत शहा यांनीही मार्गदर्शन केले.

समाजसेवक व मानवतावादी प्रकाश आमटे यांनी आपल्या मनोगतात सर्वांनी एकत्र येवून हे केंद्र चांगल्या प्रकारे चालविले पाहिजे, असे स्पष्ट केले. यावेळी आमटे यांच्या हस्ते फीत कापून केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. नामफलकाचे अनावरणही आमटे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. स्मीता वतवानी यांनी आभार प्रदर्शन केले.याप्रसंगी हेमल कसा घनशाम भिमानी, सुभाष पाटील, व्ही. आर. भिमानी, शंभु गुप्ता, रमेश मुंढे, सुधीर खन्ना, जी. जी. शहा, उर्मी शहा, डॉ. हमीर गालना, बंडु मुंढे, दक्षेस पारीख, गजेंद्र गानला, मावळणकर, नामदेव मोरे, वामन बुडेकर, रामदास सावंत, वसंत वाडेकर, बबन जाधव, सीताराम शिंदे, लक्ष्मण वाडेकर, मुकुंद कदम, नरेश जैन, अजय बडनप, आदिसह वेणगाव परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.